# गोल्डन फायबर कामगारांना झालेली विषबाधा भातातून

## कँटीनमधील अन्नाचा अहवाल पॉझीटीव्ह | कंपनीतील पाणी पिण्यायोग्य-आरोग्य विभाग

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती/नांदगाव पेठ,( दि.17 )**- नांदगाव पेठ एमआयडीसी येथील गोल्डन फायबर कंपनी मधील दोनशे कामगारांना रविवारी विषबाधा झाल्यानंतर आरोग्य विभागाने येथील पाण्याचे नमुने व कँटींगमधील अन्नाचे नमुने तपासणी नेले होते. पाच दिवसांचा प्रतिक्षेनंतर आरोग्य विभागाच्या जलनमुन्यांचा अहवाल आला असून यामध्ये पाणी पिण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष समोर आला आहे. तर कामगारांना झालेली विषबाधा ही पाण्यातून नव्हे तर कंपनीच्या कँटींगमधीन भातातून झाल्याचे पुढे आले आहे.

गोल्डन फायबर या कंपनीमध्ये जनरल शिफ्ट मधील काम करणाऱ्या दोनशे कामगारांना रविवारी अचानक उलटी, पोटदुखी व मळमळचा त्रास होत सुरू झाला होता. मात्र व्यवस्थापक जवानसिंग रावत यांनी कामगारांना ओआरएस पावडर देऊन गुपचूप काम करण्याचा दम भरला होता. मात्र काही कामगार अत्यवस्थ झाले असल्याने व कामगारांनी आरडा ओरडा केल्याने मनसे नेते पप्पु पाटील यांनी पोलिसांच्या मध्यस्तीने अखेर कामगारांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. रविवारी आरोग्य विभागाने पिण्याच्या पाण्याचे व कँटींगमधल्या अन्नाचे नमुने घेतले होते. पिण्याच्या पाण्याच्या अहवालामध्ये पाणी पिण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष समोर आला असून ही विषबाधा कामगारांनी नाश्त्यामध्ये कँटींगमधील खाल्लेल्या भातामधून झाल्याचे पुढे आले आहे.



### त्या कँटीग चे व्यवस्थापक जवानसिंग रावतच

या कँटीन मध्ये कामगारांनी जेवण केले ती कँटीन गोल्डन फायबर चे व्यवस्थापक जवानसिंग रावत यांच्याच देखरेखीत चालविली जाते. त्याठिकाणी दररोज शिळे अन्न कामगारांना देण्यात येत होते. कँटीन मध्ये अस्वच्छता, दुर्गंधी व अळ्या असलेला भाजीपाला आढळून आल्या. रावत यांनी कंपनीमध्ये अशी दहशत निर्माण करून ठेवली आहे की, कुणीही त्याच्या विरोधात बोलू शकत नव्हते. रावतकडून कामगारांसोबत असभ्य व्यवहार, महिला कामगारांना शरीरसुखाची मागणी, अश्लील शिवीगाळ करणे असे अनेक आरोप महिलांनी रावतवर केले.

त्या कंपनीमध्ये जवानसिंग रावत नकोच, त्यांनी खूप महिलांना त्रास दिला. तो कामगारांना शिविगाळ करतो. त्या कँटीनचे कुठलेही परवानगी काढली नव्हती, असे संबंधित अधिकाऱ्यांनी मला सांगितले. कुठलीच फॅक्टरी बंद पडू नये, मात्र सर्व कामगारांना न्याय मिळावा हाच माझा हेतू आहे. अनेक विषय संदर्भात एमआयडीसीमध्ये माझ्या बैठका सुरूच राहणार आहे.

**राजेश वानखडे, आमदार, तिवसा मतदारसंघ.**

जवानसिंग रावतला त्या कंपनीमध्ये ठेवूच नये. आज विषबाधेचा अहवाल आल्यानंतर रावतने कामगारांना मोठ्या प्रमाणात त्रास दिला. या विषबाधेकरिता जवानसिंग रावतच जबाबदार असू शकतात. याप्रकरणाची चौकशी करुन दोषींवर फौजदारी कारवाई व्हायला पाहीजे.

**-पप्पू उर्फ मंगेश पाटील, मनसे नेते.**

गोल्डन फायबर कंपनीमधील कामगारांना विषबाधा प्रकरणात आम्ही पाण्याचे, आणि अन्नाचे नमुने घेतले होते, कंपनीतील कँटींगमधील भातामधून ही विषबाधा झाल्याचे अहवालातून बाहेर आले.

**डॉ.सुरेश आसोले,**
**जिल्हा वैद्यकिय अधिकारी, अमरावती.**




**अमरावती- पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती येथील स्वामी विवेकानंद ऑडिटोरियममध्ये श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथ पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 5001 भक्तांनी केले एकत्रित सामूहिक परायण केले. मुखोदगत वाचक विद्या पडवळ ( मुंबई ) यांनी सुमधुर वाणीतून हे पारायण करण्यात आले.**

## कुख्यात्याला चाकूसह अटक

**अमरावती** - पोलिसांच्या रेकॉर्डवर असलेला कुख्यात आरोपी मोहम्मद वसीम अब्दुल रौफ (28) याला नागपूरी गेट पोलिसांनी 15 जानेवारी रोजी चाकूसह अटक केली आहे. आरोपी मोहम्मद वसीम हा चाकू घेऊन फिरत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती.

## 65 वर्षीय नराधमाचा 3 वर्षीय चिमुकलीवर अत्याचार

### येवदा पोलीस स्टेशन हद्दीतील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.17 )** - दर्यापूर तालुक्यातील येवदा पोलीस स्टेशन हद्दीत एका 65 वर्षीय नराधमाने 3 वर्षीय चिमुकलीवर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना काल गुरुवार दिनांक 16 जानेवारी रोजी सायंकाळी 6:30 वाजताच्या सुमारास घडली आहे. तीन वर्षीय चिमुकली ही घराबाहेर खेळत असताना या नराधमाने चिमुकलीला चॉकलेटचे आमीष देवून तिच्यावर अत्याचार केला आहे. प्रकाश पुंडकर (वय 65 वर्ष) असे नराधमाचे नाव आहे. या धक्कादायक घटनेने परिसरात खळबळ उडाली.घटनेची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी नराधमाला अटक केली असून पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सदर पीडितेला इजा झाल्याने तिला उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते आज दुपारी 12 वाजता तिच्या जबानी घेण्यासाठी तिला येवदा पोलीस स्टेशन येथे आणण्यात आले. घटनेचा पुढील तपास ठाणेदार यांच्या मार्गदर्शनात येवदा पोलीस करीत आहे. अशा घटना महाराष्टात वारंवार घडत असल्यामुळे अशा नराधमाला फाशी देण्यात यावी अशी असा संताप परिसरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# अवैध दारू वाहतुक करणारा ताब्यात

## देशी दारूसह कार जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.17 )**- कारने दारुची अवैध वाहतूक करणार्या एका आरोपीला शिरजगाव कसबा पोलिसांनी 17 जानेवारी रोजी बोदड फाटा नाकाबंदी करून ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून 29 हजार 400 रूपयाची देशी दारू व वाहन असा एकुण 4 लाख 29 हजार 400 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणात पोलिसांनी आरोपी धरमसिंग जयसींग बावरी (वय 28 वर्ष रा.आझाद नगर, परतवाडा) यांच्याविरूध्द कलम 65 (अ), (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदाअंतर्गत गुन्हा नोंदविला आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी सर्व ठाणेदार यांना अवैध दारू वाहतुक व विक्रीबाबत प्रभावी कार्यवाही करण्याबाबत आदेशीत केले होते. या अनुषंगाने शिरजगाव





कसबाच्या हद्दीतील बहीरम यात्रेत अवैध दारू विक्रीवर पोलिसांनी लक्ष केंद्रीत केले होते.

दरम्यान गुप्त माहितीवरून पोलिसांनी बोदड फाटा येथे नाकाबंदी केली अल्टो वाहन क्रमांक एमएच 27 बीई 3037 ची तपासणी केली असता, त्यात दारुचा माल आढळून आला. त्यामुळे पोलिसांनी कारमधील धरमसिंग जयसींग बावरीला ताब्यात घेतले व त्याच्याजवळील दारुचा मुद्देमाल जप्त केला. सदर कार्यवाही पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत सहाय्यक पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार, पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलिस निरीक्षक महेंद्र गवई, एएसआय सतीश पुनसे, पोलिस हवालदार भारत कोहळे, सागर जाधव, सुनिल खेरडे, मोहीत चौधरी यांनी केली.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत आणखी एक बिबट ठार

## अमरावती-नागपूर महामार्गावरील घटना | महिनाभरातील चौथा मृत्यू





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.17 )** - अमरावती- नागपूर महामार्गावर रहाटगावजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत शुक्रवारी (दि.17)पहाटे पुन्हा एक बिबट्या ठार झाला. वाहनाच्या धडकेत बिबट्याचा हा महिनाभरातील चौथा मृत्यू आहे.

बिबट्या ठार झाल्याची माहिती मिळताच वनविभागाचं पथक अमरावती- नागपूर महामार्गावर पोहोचलं. वाहनाची जोरदार धडक लागल्याने गंभीर जखमी होऊन बिबट्याचा मृत्यू झाल्याचे वनविभागाच्या पथकाला निरीक्षणादरम्यान दिसून आले आहे. मृत बिबट्याला वडाळी वनपरिक्षेत्र कार्यालय परिसरात नेण्यात आले. याच परिसरात वनविभागाचे अधिकारी आणि वन्यजीव समितीच्या सदस्यांच्या उपस्थितीत शवविच्छेदन करण्यात आले.

अमरावती शहरालगत असणाऱ्या चिरोडीच्या जंगलात 7 डिसेंबर रोजी सकाळी अज्ञात वाहनाच्या धडकेत एक बिबट्या ठार झाला होता. या घटनेच्या लगेच दुसऱ्या दिवशी याच भागात आणखी एक बिबट्या अज्ञात वाहनाच्या धडकेत ठार झाला होता.

सलग दोन दिवस दोन बिबट्या एकाच मार्गावर ठार झाल्यामुळं खळबळ उडाली होती. यानंतर 20 डिसेंबरला अमरावती-नागपूर एक्सप्रेस हायवेवर वडाळी ते महादेव खोरी दरम्यान गुणवंत बाबा मंदिराजवळ दोन वर्षे वयाचा बिबट्या वाहनाच्या धडकेत ठार झाल्याचे समोर आले होते. महिनाभरात अमरावती शहरालगत चार बिबट्या ठार झाल्याने वन्यप्राणीप्रेमींमधून चिंता व्यक्त होत आहे. मागील काही वर्षांपासून अमरावती शहर परिसरात बिबट्यांचा वावर वाढला. बिबट्यांच्या सुरक्षेबाबत वनविभागाकडून योग्य नियोजन व्हावे, अशी मागणी होत आहे.

### या परिसरात असतो बिबट्यांचा वावर

शहराच्या आसपास राहटगाव, अर्जुन नगर, विभागीय आयुक्त कार्यालय परिसर या भागातील रहिवाशांना अनेकदा बिबट्याचा वावर दिसून आला आहे. या भागात बिबट्या आहेत, असं या परिसरातील नागरिक सांगतात. दोन्ही बाजूने जंगल आहे. यासह संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ परिसरात अनेकदा बिबट्याचे दर्शन झाले आहे.

### पंचनाम्यानंतर अंत्यसंस्कार

मृत बिबट्याला वडाळी परिक्षेत्रा अंतर्गत वन्यप्राणी प्रथोमपचार केंद्र येथे आणण्यात आले. सहाय्यक वनसंरक्षक (कॅम्प व वन्यजीव) अमरावती यांचे उपस्थितीत तसेच मानद वन्यजीव रक्षक जयंत वडतकर यांचे उपस्थितीत पशुधन विकास अधिकारी (प्रयोग शाळा) डॉ. अतुल खेरडे, पशुधन विकास अधिकारी (शल्य विकात्सालय) डॉ. नितीन पाटणे यांनी बिबट मादी मृतदेहाची प्राथमिक तपासणी केली. त्यानंतर श्वविच्छेदन केले, तसेच अंत्यसंस्कार करण्यात आहे. सदर बिबटचा मृत्यु अंदाजे 10 ते 12 तासापुर्वी झाला असावा असा प्राथमिक अंदाज पशुवैद्यकीय अधिकारी यांनी व्यक्त केला.

## आजपासून क्रीडा, सांस्कृतिक महोत्सव

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.17 )**- महाराष्ट्र राज्य शासनाच्या शासन नियमानुसार व चांदूर रेल्वे शहरात क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाची परंपरा जोपासत 11 वर्षांपासून सुयश बहुउद्देशीय संस्था, चांदूर रेल्वे तर्फे क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या अंतर्गत तळागळात असलेल्या कलावंतांना स्टेज उपलब्ध करून देत कला सादर करण्याची संधी देत आहे अशी माहिती संस्थेतर्फे बुधवारी सायंकाळी स्थानिक विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेतून दिली. चांदूर रेल्वे तालुका हा क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्रसिद्ध असून चांदूर रेल्वे रसिक वर्ग खूप मोठ्या प्रमाणात आहे. ते जोपासण्याकरिता दरवर्षी सुयश बहुउद्देशीय संस्थेमार्फत उपक्रम राबवले जात आहे. सुयश बहुउद्देशीय संस्थेमार्फत 18 जानेवारी ला सकाळी 9 वाजता भव्य क्रिकेटचे सामने आयोजित केले आहे. व संध्याकाळी 7 वाजता महिलांच्या व्यथा मांडणारे चित्त थरारक चित्रांगदा नाटिका सादर होणार आहे. सादरकर्ते विशाल तराळा व त्यांची टीम अमरावती हे राहणार आहे. तर 19 जानेवारीला सायंकाळी 6 वाजता भव्य एकल नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

# संत गाडगेबाबा ट्रॅव्हल्सच्या अवैध वाहतूकीवर कारवाई करा!

### प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना निवेदन

### 24 जानेवारीला जनआंदोलनाची तयारीत



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.17 )**- मागील अनेक वर्षापासून गाडगेबाबा ट्रॅव्हल्स पूर्णत: नियमबाह्य व अवैधरित्या प्रवासी वाहतूक करत आहे. तात्पुरते परमिट काढून सदर ट्रॅव्हल्स टप्पा वाहतूक करत असून प्रत्येक थांब्यावर प्रवासी घेऊन दादागिरी करत व्यवसाय करत आहे. त्यामुळे संत गाडगेबाबा ट्रॅव्हल्सच्या अवैध वाहतूकीवर कारवाई करावी, अन्यथा जनआंदोल करू,असा इशारा नागरिकांनी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना शुक्रवारी (दि.17) दिला आहे.यापुर्वी अनेकवेळा प्रादेशिक परिवहन विभागाला निवेदन देऊन सुद्धा विभागाने गाडगेबाबा ट्रॅव्हल्सवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न केल्याने अखेर नांदगाव पेठ येथील गावकऱ्यांनी आरटीओंना स्मरणपत्र देत जनआंदोलन करण्याचा इशारा दिला दिला आहे.

गाडगेबाबा ट्रॅव्हल्सचे मालक अशोक रेवस्कर हे प्रादेशिक परिवहन विभागाकडून केवळ 10 ते 15 दिवसांचा टि.पी. परवाना काढतात मात्र संपूर्ण महिनाभर अमरावती ते मोर्शी अशा सतत फेऱ्या मारून अवैध वाहतुक करतात.पंचवटी अमरावती येथे 30 मिनीटे वाहन थांबवुन प्रवासी बस मध्ये प्रवासी जनावरांसारखे कोंबुन नांदगांव पेठ, माहुली, वाघोली, डवरगांव, चिचखेड, करजगांव, शिरजगांव फाटा, गोराळा, सावरखेड, लेहगांव, शिरखेड, निंभी, येरला, मोर्शी ह्याप्रमाणे प्रत्येक स्टॉपवरून प्रवासी चढउतार करतात.दिवसभर प्रादेशिक परिवहन विभागांच्या नियमांचे भंग करत अशोक रेवस्कर हे आपण पोलीस दलात अधिकारी असल्याची बतावणी करून इतर प्रवासी वाहन चालक, मालकांना जीवे मारण्याची धमकी देतात असेही निवेदनात नमुद आहे. इतर वाहनांना संधी मिळत नसल्याने अनेकांना हा व्यवसाय सोडण्यास रेवस्कर प्रवृत्त करत असल्याचा आरोप अक्षय पांडे, पप्पू चोपडे,राजू वानखडे, अंबादास राऊत व गावकऱ्यांनी केला आहे. रेवस्कर यांच्या प्रवासी वाहनांना आरटीओ कडून अभय मिळत असल्याचा आरोप सुद्धा तक्रारकर्त्यांनी केला आहे. नियमाने प्रवासी वाहतूक व्हावी एवढीच निवेदनकर्त्यांची विनंती आहे. मात्र अश्या अवैध प्रवासी वाहतुकीला आरटीओ विभाग सहकार्य करत असेल तर आम्हाला जनआंदोलनाशिवाय पर्याय नसल्याचे निवेदनकर्त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे आरटीओ विभागाने या अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालावा अन्यथा 24 जानेवारीला जनआंदोलन करण्याचा इशारा निवेदनकर्त्यांनी दिला आहे.

# वडाळी पारधीबेड्यावर पोलिसांची धाड

## 3250 लीटर मोहाचा सडवा, 110 लिटरची गावटी दारू केली नष्ट

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.17 )** - फ्रेजरपुरा पोलिसांनी 17 जानेवारी रोजी वडाळी पारधी बेडा परिसरात गावठी दारू विक्री करणार्या चौघांना पकडले. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून 3250 लिटरचा मोहाचा सडवा आणि 110 लीटरची गावठी दारू असा एकुण 1 लाख 89 हजार 600 रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला.

फ्रेजरपुरा ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनी अवैध व्यवसाय करणारे गुन्हेगार, गावठीदारू तयार व विक्री करणार्या आरोपींविरूध्द कठोर कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते. या अनुषंगाने पोलीस निरीक्षक निलेश करे व निलेश गावंडे यांच्या नेतृत्वात फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार, तसेच आर.सी.पी. पथकाने वडाळी पारधीबेडा येथे अवैध दारू विक्री प्रतिबंध मोहीम घेतली. यामध्ये पोलिसांनी संशयीत इसम नागेश सैनेश पवार (33 वर्षे, रा. भारत नगर, पारधी बेडा, वडाळी, अमरावती) याच्या राहत्या घराच्या आवारातून हात भटटीची दारू तयार करण्याचे साहीत्य, मोहाचा सळवा व इतर साहीत्य जप्त केले.



तसेच 75 हजार 900 रुपयांचा माल ताब्यात घेऊन तो नष्ट केला. तसेच मनोहर बालाजी मसराम (48, रा. गवळीपुरा, वडाळी नाक्या जवळ, अमरावती) याच्या ताब्यातून 42 हजार 600 रुपयांचा मुद्देमाल जप्त करून नष्ट केला.

पोलिसांनी संशयीत महीला साधना पल्हेवान पवार (वय 40 वर्षे, रा. भारत नगर, पारधी बेडा, वडाळी, अमरावती) हिच्या घराच्या आवारातून 62 हजार 600 रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करून नष्ट केला. तर कलावती जिवन पवार (वय 38 वर्षे, रा. भारत नगर, पारधी बेडा, वडाळी, अमरावती) हीच्या राहत्या घराच्या आवारातून 8 हजार 500 रुपयांचा माल जप्त करून, नष्ट केला. या चारही प्रकरणांमध्ये एकुण 1 लाख 89 हजार 600 रुपये किमंतीचा चा मुद्देमाल नष्ट करण्यात आलेला आहे.

# कार जळून खाक, दाम्पत्य थोडक्यात बचावले!

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.17 )** - मोर्शी रोडवर शुक्रवारी सकाळी एका कारने पेट घेतल्याने खळबळ उडाली होती. वाहनात मराठा कॉलनी स्थित गोपाल नगर येथील रहिवासी दाम्पत्य बसले होते. ते थोडक्यात बचावले.

शुक्रवारी सकाळी 11 वाजताच्या सुमारास राजेंद्र दाभाडे हे दाम्पत्य कार क्रमांक एमएच 06 एबी 9785 ने मोर्शी रोडने जात होते. दरम्यान कारमधून निघालेला धुर पाहून ते कारमधून उतरले. त्यानंतर कारला आग लागली. हे दाम्पत्य लग्न समारंभासाठी मोर्शी येथे जात होते. दरम्यान ही घटना घडली. या घटनेच्या माहितीवरून नांदगाव पेठ पोलिसांनी घटनास्थळ गाठले. त्यानंतर या घटनेच्या माहितीवरून अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळविले.



आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अगोदर सुविधा करा, मग पुनर्वसन करा!

## खासदार बळवंत वानखडे यांचे निर्देश ■ पेढी प्रकल्पबाधीत पाच गावांची आढावा बैठक




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.17 )**- भातकुली तालुक्यातील निम्न पेढी सिंचन प्रकल्पाची घळभरणी महसूल प्रशासन तथा जलसंपदा विभागामार्फत जून 2025 मध्ये जाहीर करण्यात आली असून प्रकल्पबाधितांना स्थलांतरणाच्या सूचना वजा आदेश दिले आहेत. पुनर्वसनस्थळी पुरेशा नागरी सुविधा नसताना तेथे राहायचे कसे, घर बांधायचे कसे, असा प्रश्न उपस्थित करत %आधी योग्य मूलभूत सुविधा पुरवा, नंतरच स्थलांतरण, करा असा पवित्रा प्रकल्पबाधितांनी घेतला आहे. त्यामुळे याबाबत अमरावती चे खासदार बळवंत वानखडे यांनी जिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रकल्प तसेच पुनर्वसनाशी संबंधित अधिकाऱ्यांशी आढावा बैठक घेऊन मूलभूत सुविधा पुरवल्यानंतरच पाच गावांचे स्थलांतरण करा असे निर्देश दिलेत.


अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्र. 1 अमरावती विभागाच्या लेटलतिफ कारभारामुळे बुडित क्षेत्रातील पाचही गावांच्या पुनर्वसनस्थळी पुरेशा मूलभूत नागरी सुविधा तिथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. अशातच भातकुलीच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी 2 जानेवारी बुडित क्षेत्रातील हातुर्णा, कुंड सर्जापूर, गोपगव्हान, अळणगाव सातुर्णा या पाच गावातील सरपंचांना पुनर्वसनात स्थलांतर करण्यासाठी नोटीस पाठविल्या. परंतु पुरेशा मूलभूत सुविधा उपलब्ध नाल्याने सदर गावात राहायचे कसे अशी समस्या या ग्रामपंचयातीमार्फत खासदार बळवंत वानखडे यांच्याकडे मांडण्यात आली होती. त्या अनुषंगाणे जिल्हाधिकारी कार्यालयात प्रकल्प व पुनर्वसनाच्या बाबतीत आढावा बैठक पार पडली. यात, या पाचही गावात प्रामुख्याने मूलभूत सुविधा संपूर्णता निकामी झाल्या आहेत. नागरी सुविधांचा अभाव असून रस्ते , नाल्या , ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी , सभागृह , पाण्याची टाकी , पाणीपुरवठा पाईपलाईन, प्रवासी निवारा, गोडाउन, सुस्थितीत नसून याबाबत मोठ्या प्रमाणात गावकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाला. तसेच भूखंड वाटप, घरकुल योजना याबातही मोठ्या प्रामाणात तक्रारी प्राप्त झाल्या. संपूर्ण मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्याशिवाय पाचही गावातील नागरिकांना स्थलांतरणाची जबरदस्ती करू नये असे निर्देश खासदार बळवंत वानखडे यांनी बैठकीत दिले.

तसेच राज्यस्तरावर जाहीर झाल्याप्रमाणे सरसकट पुनर्वसीत गावांना हेक्टरी 5 लक्ष रुपयांची रक्कम गांव सोडायच्या आधी देण्यात यावी, अकोला जिल्ह्यातील उमा बॅरेज ता. मूर्तीजापूर आनंतगत बाधित लंगापूर पोहि येथे पुनर्वसीत पॅकेज नुसार 8.26 लक्ष प्रत्येक कुटुंबाला देण्यात आले. त्याच धर्तीवर जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांना लाभ देण्याबाबतच्या सूचना सदर बैठकीत देण्यात आल्या. बैठकीला जिल्हाधिकारी सौरभ कटियार, निवासी जिल्हाधिकारी अनिल भटकरउपविभागीय अधिकारी मीनू पी. एम. तिवसा , तहसीलदार तिवसा लोखंडे, कार्यकारी अभियंता पिंजरकर, माजी उपाध्यक्ष जि. प. अमरावती हरिभाऊ मोहोड, सरपंच कुंड सर्जापुर नीलेश मानकर, सरपंच अळणगाव गौतम खंडारे, अनिल तायडे तसेच मोठ्या प्रमाणात पुर्नवसीत गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# शेतातील कृषी पंपांचा वीज पुरवठा डिसेंबर महिन्याप्रमाणे करा!

## अन्यथा बेनोडा शहीद बस स्थानक परिसरात ठिय्या आंदोलन

### गोपाल नांदुरकर यांचा इशारा





**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.17 )**- तालुक्यातर्गत येत असलेल्या बेनोडा शहीद येथे शेतातील वीज पुरवठा हा रात्री 11. 55 वाजता सुरु होतो आणि सकाळी 06.55 पुन्हा बंद केल्या जातो. महावितरण च्या या धोरणामूळे शेतकऱ्यांना पिकांना ओलीत करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. त्यामूळे शेतकऱ्यांना डिसेंबर महिन्याप्रमाणे नियमित वीज पुरवठा करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते गोपाल नांदुरकर यांनी केली आहे. मागणीची पुर्तता न झाल्यास बस स्थानक परिसरात ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

वीज पुरवठा रात्री-बेरात्री होत असल्याने शेतकऱ्यांना थंडीच्या दिवसात रात्रीलाच जीव धोक्यात टाकून ओलीत करण्याकरिता जावे लागत आहेत. अपुऱ्या वीज पुरवठ्यामूळे शेतकऱ्याचे ओलीत नियमित होत नाही. परिणामी शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान होत असून आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे इलेक्ट्रिक बाबत दिलेला शेड्युल बदलवून डिसेंबर 2024 या महिन्यात देण्यात आलेला शेड्युल नेहमी करता देण्यात यावा जेणेकरून शेतकऱ्यांना शेतातील ओलीत करण्यास अडचणी निर्माण होणार नाही. 19 जानेवारीपासून पूर्वीचाच इलेक्ट्रिक बाबतचा शेड्युल लागू करण्यात यावा अन्यथा दि. 20 जानेवारीला सकाळी 11 वाजता बेनोडा शहीद येथील बस स्थानक परिसरात सर्व शेतकरी ठिय्या आंदोलन करतील याची सर्वस्वी जबाबदारी ही आपली राहील असा इशारा गोपाल नांदुरकर यांनी सहाय्यक अभियंता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी बेनोडा शहीद यांना निवेदनातून दिला आहे.

# काटी शाळेला सन्मान चिन्ह देवून केला गौरव

## नितीन खेरडे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम




**महासागर प्रतिनिधी**
**वरूड,( दि.17 )**- काटी शाळेने क्रीडा स्पर्धेमध्ये भरारी घेतल्याबद्दल विद्यार्थ्यांचा, शाळेचा व शिक्षकांचा रोटरी क्लब ऑफ वरुडचे अध्यक्ष नितीन खेरडे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त श्री संत अच्युत महाराज वरुड येथे रक्तदान शिबिरामध्ये शाळेचा गौरव केला आहे. याकरिता शाळेने तसेच गावातील नागरिकांनी नितीन खेरडे यांचे आभार मानले आहे.

नितीन खेरडे यांच्या वाढदिवसानिमित्त 4 ला श्री संत अच्युत महाराज देवस्थान , वरूड येथे रक्तदान शिबिर आयोजित केले होते. यावेळी राज्यसभेचे खा. डॉ.अनिल बोंडे व आ.उमेश यावलकर व्यासपीठावर उपस्थित होते. शैक्षणिक वर्ष 2023- 24 मध्ये जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा काटी या शाळेने जिल्हा स्तरावरून टेनिक्वाईट दुहेरी मध्ये विजय संपादन केला होता. तसेच एकेरी मध्ये उपविजय संपादन केला होता. शैक्षणिक वर्ष 24 -25 मध्ये राजुरा बाजार येथे केंद्रस्तरीय झालेल्या क्रीडा स्पर्धेत काटी शाळेला चॅम्पियनशिप मिळाले. त्याबद्दल नितीन खेरडे यांनी काटी शाळेला सन्मानचिन्ह दिले व विद्यार्थ्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमाला काटी शाळेचे शिक्षक प्रदीप गणोरकर शाळेच्या विद्यार्थिनी, खुशबू निंभोरकर, तन्वी खडसे तसेच रक्तदान करणाऱ्यांची तसेच भारतीय जनता पार्टी कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. यावेळी काटी शाळेचे शिक्षक व गावकऱ्यांनी नितीन खेरडे यांचे यावेळी आभार मानले आहे.

# रामप्रसाद काणेकर, रामलाल भिलावेकर यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्कार

**महासागर प्रतिनिधी**
**धारणी,( दि.17 )** - पंचायत समिती अंतर्गत चटवाबोट येथील ग्रामविकास अधिकारी रामप्रसाद काणेकर व जांबू ग्रामपंचायत चे ग्रामसेवक भिलावेकर यांना नुकताच जिल्हा परिषद अमरावती येथील मुख्यकार्यपालन अधिकारी संजिता मोहापात्रा यांचे हस्ते आदर्श ग्रामसेवक पुरस्कार सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराबाबत त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष राम प्रसाद काणेकर मेळघाट मधील साद्राबाडी येथील मूळचे रहिवासी आहेत. मेळघाट मधील विविध समस्या व त्यांवरील उपयोजना यावर त्यांचा दांडगा अभ्यास आहे. आदिवासी बांधवांना पुढे नेण्यासाठी विविध माध्यमातून जाणीव जागृती करणे, तसेच पेसा कायदा व आदिवासी स्वशासन कायदा याबाबत सुध्दा त्यांचा अभ्यास आहे. ग्रामविकासासाठी त्यांनी तालुक्यात अनेक प्रयोग राबविले. त्यांच्या या कार्याची दखल घेत जिल्हा परिषद मार्फत त्यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्कार 2022-23 ने सन्मानित करण्यात आले. तसेच जांबू ग्रामपंचायत चे ग्रामसेवक रामलाल भिलावेकर हे देखील तालुक्यातील चीचघाट येथील रहिवासी असून मेळघाट मधील गावांचा विकास करणे हे ध्येय समोर ठेऊन प्रामाणिकपणे कार्य केले. त्यांच्याही कामाची दखल जिल्हा परिषद प्रशासनाने घेवून त्यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने सन्मानित केले. याप्रसंगी मुख्य कार्यपालन अधिकारी संजीता मोहापात्रा यांची विशेष उपस्थित होती. सर्व ग्रामसेवक हे जिल्हा परिषदेचा कणा आहे. समाजाला त्यांच्याकडून काही देणं लागते. या भावनेतून काम करून गावांचा विकास साधण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करण्याचे ग्रामसेवकांना आवाहन मोहापात्रा यांनी केले.

# गवळी विकास संस्थेची मोर्शी येथे सभा




**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी ( दि.17 )** - महाराष्ट्रातील समस्त गवळी समाजाच्या आर्थिक सामाजिक शैक्षणिक विकासासाठी राज्यस्तरीय संघटना 'समस्त गवळी विकास संस्था' ची स्थापना नुकतीच करण्यात आली. राज्यस्तरीय प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची आढावा सभा मोर्शी येथील ज्ञानदीप विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय येथे रविवार दि.5 जानेवारी 2025 रोजी दुपारी घेण्यात आली.

यावेळी अध्यक्षस्थानी नूतन प्रदेश अध्यक्ष अशोक भाले हे होते. या सभेत समस्त गवळी विकास संस्थेचे प्रदेश उपाध्यक्ष अमरावतीचे सलीम मीरावाले, धारणी येथील प्रदेश उपाध्यक्ष मनोहर मोरे, ज्येष्ठ मार्गदर्शक मोर्शीचे महादेवराव उपरोट, मेळघाट विभागातील ज्येष्ठ मार्गदर्शक अनोखीलाल वाघमारे, गवलान समाज संघटनेचे अध्यक्ष चिरंजीलाल खंडेलवाल, मोर्शीचे पांडुरंग ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रस्ताविकातून सलीम मीरावाले यांनी संघटन शक्तीचे महत्त्व विशद करून सर्वांनी समस्त गवळी विकास संस्थेच्या बॅनरखाली एकत्र येण्याचे आवाहन केले. श्रीकृष्ण प्रतिमा पूजनानंतर मिलिंद ठाकरे, राहुल ठाकरे, विशाल ठाकरे, अचेतन भुतकर, सुनील ठाकरे, शरद सोयस्कर, शोभाराम मेटकर, हरिदास भारवे, रूपचंद पटोरकर, सुखराम भिलावेकर, मोहन शेलेकर, रवी मावसकर, अजबराव पाटणकर, भैयलाल कस्तुरे यांनी मनोगतातून समस्या मांडल्या. मेळघाटातील मनोहर मोरे, अनोखीलाल वाघमारे, चिरंजीलाल खंडेलवाल इत्यादींनी इत्यादींनी मेळघाटात वास्तव्यात असलेल्या गवलान, ग्वाल वंश, गवळी यांच्या समस्या मांडल्या. यात गवलान, ग्वाल वंश या उपजातींना केंद्राच्या ओबीसी सूचीत घेणे, पेसा कायद्यात सुधारणा करणे, आदिवासींच्या समकक्ष नोकरी धंद्यात आरक्षण देणे याचा समावेश आहे. भटक्या जमाती व प्रवर्गासाठी आरक्षण मर्यादा अडीच टक्क्याहून पाच टक्के करणे, नॉनक्रिमीलेयरची मर्यादा पंधरा लाख करणे, गाई, म्हशी खरेदी करण्यासाठी 90 टक्के अनुदानासह बिनव्याजी कर्ज देऊन गवळाऊ गाईचे संरक्षण करणे आदी मागण्यांचा मागोवा घेण्यात आला. यावेळी प्रदेशाध्यक्ष इंजिनिअर अशोक भाले यांनी संघटनेच्या माध्यमातून गवळी समाजाच्या प्रमुख मागण्या शासनाकडे मांडणार, सोबतच समाज प्रबोधन करून सामाजिक सुधारणा करणे तसेच नजकाच्या भविष्यात सदस्यता नोंदणी, संघटना बांधणी, जनगणना करण्याचा मानस व्यक्त केला.

## बडनेरातील वरली मटक्यावर धाड

**अमरावती** - बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या वरली मटक्याच्या अड्ड्यावर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी 15 जानेवारी रोजी धाड टाकून प्रदीप देवानंद अडकटे (35, रा. इंदिरा नगर) याला ताब्यात घेतले. यावेळी अकबर मोहम्मद चौधरी (33) आणि करीम उर्फ लाल हब्बू चौधरी हे दोघे घटनास्थळावरून पळून गेले. पोलिसांनी घटनास्थळावरून वरळी मटकाचे साहित्य व 420 रुपयांची रोख जप्त केली आहे. पुढिल तपास बडनेरा पोलीस करीत आहे.

# खाजगी बसेसचे नियमबाह्य सरपटत धावणे सुरुच!

## प्रादेशिक परिवहन विभागाची कवडीभरही भीती नाही



**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा, ( दि.17 )**- अमरावती ते परतवाडा, परतवाडा ते अकोट येथे चालणाऱ्या खाजगी बसेसचे परवाने नियमबाह्य झालेले असतानासुध्दा या बसेस निर्धास्तपणे सरपट धावताना दिसताहेत. प्रादेशिक परिवहन विभागाची (आरटीओ) कवडीभरही दहशत या बस चालक, मालकांमध्ये राहिली नसल्याने

खासगी बस गाड्यांचे परवाने मुदतबाह्य झाल्यानंतरही या खाजगी बसेस अवैधरित्या धावत आहे. या संदर्भात जय बजरंग टूर्स अँड ट्रॅव्हल्सचे संचालक राजेश भोंडे यांनी जिल्हा प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांची भेट घेऊन नियमबाह्य पद्धतीने व वेळेनुसार न चालणारे खाजगी बसेसवर कारवाई करण्यासाठी तक्रार दिली होती, परंतु प्रादेशिक परिवहन कार्यालयातील भरारी पथकाद्वारे केलेल्या कारवाईची कुठलीच भीती बस संचालकांना दिसत नाही. या खाजगी बसेसमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी भरुन बसफेऱ्या मारल्या जातात. दुसरीकडे या बसेसला प्रवासी वाहतूक करण्याचा देण्यात आलेले परवाने मुदत बाह्य झाले आहे, तरीसुध्दा या बसेस धावताहेत. जिल्ह्यात वाहतूक व्यवस्थेचे धिंडवडे उडविल्या जात असल्याचे या प्रकारातून दिसत आहे. तक्रार प्राप्त होताच परिवहन विभागाकडून एक प्रक्रीया म्हणून भरारी पथकाद्वारे दंडात्मक कारवाईचा बागुलबुवा करत कारवाईची फाईल बंद केली.

### सेमाडोहच्या अपघाताला कोण जबाबदार

काही महिन्यांपुर्वी अमरावतीहून खंडवा कडे धावणारी चावला बस सेमाडोह जवळील पुलामध्ये कोसळली होती. ज्यामध्ये 5 प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले. ही ताजी घटना असतानाही प्रादेशिक परिवहन विभाग जर बेजबाबदारपणा करित असेल तर या अपघाताला प्रादेशिक परिवहन कार्यालयच जबाबदार असल्याचे म्हणता येईल. बस अतिरिक्त प्रवाशी घेवून घाट माथ्यांमधून धावताहेत, परंतू या बस संचालकांना कुणाचीच भीती नाही, हे विशेष.

# प्रजासत्ताक दिनासाठी समन्वयाने कार्य करावे-आरडीसी

## प्रजासत्ताक दिन सोहळ्याचा आढावा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.17 )** - जवाहरलाल नेहरू स्टेडीयम येथे प्रजासत्ताक दिनी मुख्य ध्वजवंदनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. यावर्षी 76 वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी दिले.

निवासी उपजिल्हाधिकारी भटकर यांनी, ध्वजवंदनासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व कार्यवाही तातडीने पूर्ण करावीत. प्रामुख्याने मैदान स्वच्छता आणि पोलिस कवायतीसाठी आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्यात याव्यात. ध्वजवंदनानंतर सादर करण्यात येणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी शिक्षण विभागाने शाळांशी समन्वय साधावा. मैदानावर प्रामुख्याने स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची सोय महापालिकेतर्फे करण्यात यावी. पोलिस विभागाने ध्वजवंदनासाठी आवश्यक असणारी सामुग्री आणि कवायतीची व्यवस्था करावी, अशा सूचना दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीला भातकुलीच्या उपविभागीय अधिकारी पी.एम.मिन्नू उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जून ठोसरे, तहसिलदार विजय लोखंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस, जिल्हा क्रिडा अधिकारी गणेश जाधव यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते.

# आमदारांनी घेतली न.प. च्या विविध समस्यांवर आढावा बैठक

## नागरिकांनी वाचला समस्यांचा पाढा वाचला





**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.17 )**- नवनिर्वाचित आमदार उमेश यावलकर यांनी मोर्शी नगर परिषद, कार्यालयात गुरुवारी (दि.16 जाने) सकाळी आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत शहरातील नागरिकांनी त्यांच्या समस्या मांडल्या. या बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना, स्वच्छता अभियान, पाणीटंचाई, अण्णाभाऊ साठे योजना, घरकुल योजनेसंदर्भात अनेक समस्यांवर नागरिकांनी उघड केल्या. नगर परिषद अंतर्गत येणाऱ्या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी मुख्य अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश आमदारांनी दिले आले.

बैठकीत आमदार उमेश यावलकर यांनी नागरिकांच्या समस्या गांभीर्याने ऐकून घेतल्या आणि त्या सोडवण्यासाठी प्रशासनासोबत समन्वय साधून तातडीने पावले उचलण्याचे आश्वासन दिले. बैठकीत नागरिकांनी घरकुल योजनेच्या अंमलबजावणीबाबत चिंता व्यक्त केली. वंचित समाजातील अनेक नागरिकांना अद्याप घरकुल मिळालेले नाही. अण्णाभाऊ साठे योजनेच्या लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचत नसल्याची तक्रार देखील करण्यात आली. याशिवाय, शहरात पाणीटंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी यावेळी नागरिकांनी केली. मोर्शी शहरातील जड वाहतुकीमुळे होणारी वाहतूक कोंडी आणि त्यामुळे होणाऱ्या दुर्घटनांबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली. जड वाहतुकीला पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्याचे आणि शहरातून जड वाहतूक बंद करण्याचे आदेश यावेळी देण्यात आले. आमदार उमेश यावलकर यांनी जड वाहतुकीच्या मार्गासाठी पर्यायी उपाय शोधून यंत्रणांना लवकर अंमलबजावणीचे निर्देश दिले. डीपी रोडच्या अपूर्ण कामांबाबत नागरिकांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त केली. अनेक रस्त्यांची कामे रखडली असून त्यामुळे होणाऱ्या त्रासाबाबतही तक्रारी करण्यात आल्या. अपूर्ण रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.शहर स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबवण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ आणि संसाधनांची मागणी यावेळी करण्यात आली. कचरा व्यवस्थापनाबाबत नागरिकांनी असमाधान व्यक्त केले. यावर मुख्य अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. शहरातील तहसील कार्यालयाच्या उद्घाटनाबाबत चर्चा झाली. तसेच, नगर परिषद उपाययोजनांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. सरकारी योजनांचा अधिकाधिक लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आश्वासनही आ.यावलकर यांनी यावेळी केले. या बैठकीस भारतीय जनता पक्षाचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या आणि त्या सोडवण्यासाठी तत्काळ पावले उचलण्याचे आश्वासन आमदारांनी दिले.

> “आढावा बैठकीत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनासोबत हातमिळवणी करून कार्यरत राहणार आहे. नागरिकांच्या समस्या ऐकून त्या सोडवण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावी, तसे आदेश देण्यात आले. बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना, स्वच्छता अभियान, घरकुल योजना, डीपी रोडसारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली. नागरिकांना समस्या सोडवण्यासाठी लवकरच सकारात्मक तोडगा काढू.
>
> **- उमेश यावलकर,**
> **आमदार, मोर्शी विधानसभा मतदारसंघ.**

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी व माझे पक्षकार नामे **'रंजनाबाई गोवर्धनराव धांडे'** यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन** - मौजे कुऱ्हा, सर्वे क्रं. 233/1-A, प्लॉट क्रं. 16 पैकी, ता. तिवसा जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार 'रंजनाबाई गोवर्धनराव धांडे' यांच्या मालकीचे आहे. तदनंतर, त्यांनी Easy Home Finance Limited (EHFL) येथे गृह कर्जाकरीता अर्ज केला असता वरील वर्णनाचे मूळ खरेदीखत दि. 17/05/2006 रोजीचे दस्त क्र. 689 या खरेदीमधील पान क्रं. 14 ते 17 गहाळ झालेले आहे. तसेच वरील नमूद दस्त कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी//पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमतेवीषयी शासकीय-नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली देलेल्या माझ्या मोबाइल क्रं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

कोर्ट शिक्का

**आपला**
**Advocate**
**रवींद्र र वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलनी,अमरावती**
**मो. नं. 9823698745**